# प्रकरण चौथे

## व्यक्तिचित्रण

व्यक्तिचित्रण हा कथेतील एक महत्वपूर्ण घटक आहे. कथेमध्ये कथानकाला जे महत्व असते तेच महत्व व्यक्तिदर्शनाला आहे. घटना-प्रसंगाइतके कथेत स्वभाव-चित्रणालाही महत्व आहे. एखाद्या व्यक्तिचे मन, स्वभाव, अंतर्मन यांचे चित्रण महत्वाचे असते. " कथारचनेपेक्षा व्यक्तिदर्शनचातुर्य दसपटीने अधिक महत्वाचे आहे."[१] असे ना.सी.फडके यांनी म्हटले आहे. तर आर्नोल्ड बेनेट एके ठिकाणी म्हणतो "The Foundation on good Fiction is character and nothing else"......... असे असून कथानकापेक्षा व्यक्तिदर्शन हेच महत्वाचे आहे हा विचार जवळ-जवळ सर्वमान्य आहे. म्हणून "व्यक्तिचित्रण हा ललित वाङ:मयाचाच एक महत्वाचा भाग आहे." [२] असे प्रल्हाद वडेर म्हणतात.

जुन्या कथाकारांनी माणसाच्या वर्तनातील वरवरच्या चित्रणालाच महत्व दिले. माणसाच्या अंतर्मनाचा शोध न घेता एकाच पातळीवरुन त्यांच्या व्यक्तिमत्वाची ओळख चित्रित करण्यात धन्यता मानली. नवकथेचे शिल्पकार म्हणून ओळखल्या जाणा-या गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर या नवकथाकरांनी माणसांच्या अंतर्विश्वात प्रवेश करुन त्याच्या व्यक्तिमनातील विविध पैलू, संगती-विसंगती, अंतर्मनातील संघर्ष या सा-यांचे अत्यंत उत्कटतेने चित्रण केले. गंगाधर गाडगीळ म्हणतात त्याप्रमाणे, "१९४०-४५ पर्यंतची कथाही कथानक प्रधान होती. १९४५ नंतरच्या नवकथेच्या प्रमुख शिल्पकारांनी मात्र लघुकथेत व्यक्त होणा-या अनुभवालाच महत्व दिले. मनोविश्लेषण हा त्यांच्या कथेचा एक अविभाज्य भाग आहे. त्याला माणसाच्या गुंतागुंतीच्या व्यक्तित्वाचे आपल्या कथातून मराठी वाचकांना दर्शन घडविले. आणि मानवी व्यक्तित्वाच्या अजाणतेपणात बुडालेल्या भागाचे चित्रण करुन त्याला एक नवे परिणाम व पूर्णत्व दिले."[3] आणि हे योग्य वाटते.

१९६० नंतरच्या काळात सुधा नरवणे, इंद्रायणी सावकार, सरिता पदकी, लिला श्रीवास्तव, वसुधा पाटील, जोत्स्ना देवधर, शकुंतला गोगटे, आशा भाजेकर

यांची कथा नवीन वळणे घेत झपाट्याने बदलली. त्या कथातून त्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्व प्रगट झाले. वसुधा पाटील यांनी व्यक्तिंच्या अंतर्विश्वात प्रवेश करुन त्यांना आपल्या कथेतून मुखर करण्याचा प्रयत्न केला.

वसुधा पाटील यांच्या कथांतून वावरणा-या व्यक्ती तुम्हा-आम्हां सारख्याच आहेत. कधी सुखाचा शोध घेण्यासाठी धडपडणारी, दु:ख भोगणारी, आलेल्या संकटाशी तोंड देणारी आहेत. या ना-या व्यक्ती या ना त्या कारणाने बांधलेल्या असतात. विचित्र जीर्ण वाट्याला येऊनही जीवनावर अपार श्रध्दा ठेवणारी आहेत. त्यांच्या कथांनी व्यक्तिंच्या मनातील विविध पैलू हळुवारपणे उलगडवून दाखविले आहेत.

वसुधा पाटील यांच्या दोन्ही कथासंग्रहात व्यक्तिप्रधान कथांचा एक गट आहे. या कथा प्रामुख्याने नायिकाप्रधान आहेत. नायिकांचे मनस्वी स्वभाव हे या कथांचे वैशिष्ट्ये होय. त्यांना घटनांपेक्षा व्यक्तित जास्त रस आहे. त्यांच्या कथेतील नायिका स्वतंत्र विचारसरणीच्या आहेत. त्यांचीही काही मूल्ये आहेत. त्यांच्या कथेतील या व्यक्ती स्वत:चे असे एक खास वेगळेपण घेऊन अवतरतात. त्यांच्या कथेतील व्यक्ती विलक्षण, कलंदर, सोशिक, संयमी, निरागस, पोरक्या, अनाथ, कर्तबगार, स्वप्नाळू-तीच्या प्रेमळ, निग्रही, बदफैली, श्रध्दाशील, भावनाशील, रसिक, अगतिक अशा विविध गुणधर्माच्या व्यक्ती आल्या आहेत.

अ) <u>स्त्री व्यक्तिरेखा</u> :

'मनू' कथेतील मनू अबोल आहे पण तिच्या डोळ्यांतील ताकद मात्र विलक्षण बोलकी आहे. एकदा निर्णय घेतला की पाऊलही मागे हटायचे नाही. मग कितीही कष्ट सोसावे लागले तरी चालतील हा तिच्या वृ-तीचा एक वेगळा पैलू आहे. म्हणून आपल्या जोडीदाराला पारखण्यासाठी त्याच्याबरोबर सहा महिने राहून पाहते. ज्याच्यावर तिने प्रेम केले. त्याच्यापासून तिला दिवस जातात. पण तिचे दुर्दैव असे की, तोच अपघातात मरण पावतो आणि लग्न

करायचे राहून जाते. पण त्याच्याबरोबर राहिल्याने सहा महिन्यात जे सुख मिळालेले आहे त्याच्यावर ती सारं आयुष्य काढणार आहे. स्वत:चा प्रश्न स्वत: सोडविण्याची तिची खंबीर वृत्ती आहे. तिने केलेला हा निर्धार लक्ष वेधणारा ठरतो. ( मनू )

नियोजित वराने लग्न मोडले किंवा तो बदफैली असल्याचे कानावर आले तरी सुध्दा त्याच्याशीच लग्न करण्याचा निग्रह टिकवणारी व कधी तरी आपण याची पत्नी आहोत हे त्याला पटेल, अशी आशा बाळगणारी 'सुचेता' आहे. भारतीय पारंपारिक पावित्र्याचे संस्कार ती जपते. आपल्या अजितवर मनापासून प्रेम करते. एकदा एकाला मनोमन वरल की तो बदलला तरी त्यालाच आपलं मानायचं जेंव्हा येईल तेंव्हा त्याला सर्वस्व द्यायला तयार व्हायचं अशा वेगळ्या जाणिवा असणारी आणि या जन्मी नाहीआला तरी पुढच्या जन्मी तो आपल्याला भेटावा म्हणून जन्मभर पुण्यकृत्य करीत राहणारी सुचेता आहे. (सुचेता )

जीवनाविषयी कांही निश्चित कल्पना उराशी बाळगणारी सरला आहे. तिचा स्वभाव मनस्वी असून आपला जीवनसाथी कसा असावा, याची चोखंदळ दृष्टी तिच्यात आहे. सैनिकांसाठी फंड जमा करणारी, श्रीकांतच्या कॉलेजची फी भरणारी, सामाजिक कार्यात भाग घेणारी, आपल्या प्रियकराला व्यसनापासून परावृत्त करणारी, त्याचे जुगाराचे पैसे नाकारणारी, माणसाने माणसासारखं जगाव हा संदेश त्याला देणारी सरला आहे, मात्र ती अनाथ आश्रमात वाढली असून पोरकी आहे. ( कस्तुरबा )

पतीच्या विरहानंतर त्याच्या मिलनासाठी अधिर झालेली इंदिरा आहे विरह वेदना काय असतात याची जाणिव तिला आहे. पण सतरा वर्ष विधवा असणा-या आपल्या आक्काच्या वेदना, पीडा, तिचा विरह एक स्त्री या नात्याने इंदिरा ओळखते आणि म्हणूनच आपल्या पतीला आपल्या विधवा बहिणीकडे पाठविणारी ही उदात्त स्त्री विलक्षण आहे. (स्त्री)

तेवीस वर्षांच्या आपल्या नातवाचा प्रेमभंग झाल्यावर त्याला ख-या प्रीतीची ओळख करून देणारी, प्रीतीच्या जोरावर सारी हयात उमेदीत काढणारी सत्तसष्ट वर्षांची रसिक आजी आहे. ( प्रीतीचे दान ) जवळ जवळ वेडयात गणना केलेली, पण कोमल व मार्दव सुरात गाणारी सुंदर, कोमल असून दुस-याचे उपकार नसावेत असे वाटणारी पुरुषाचे मन आपल्या सौंदर्याने आकर्षित करून घेणारी बिंदा आहे ( बिंदा )

हाव आणि मोह यामुळे दररात्री अब्रु गहाण ठेवण्याचा धंदा पण तोही एका खास पद्धतीने करणारी, पैशाचं आणि देहाचं मोल जोखून घेणारी, चोखंदळ नजरेने गि-हाईक पारखणारी गिरिजा आहे. गि-हाईक निवडलं की मग सारा सौदा विसरून पतिव्रतेसारखं त्याच्याशी समरस होणारी ती आहे. पुरुष असून पौरुष हरवलेल्या पुरुषोत्तमाची ती मैत्रिण होते. त्याचं दुःख मनापासून दूर करण्याचे आश्वासन त्याला देते. तिच्या त्याला पौरुष मिळवून देण्याच्या यशस्वी प्रयत्नामुळे पौरुष मिळविलेला पुरुषोत्तम गिरिजाच्या घट्ट बाहुपाशात पाहावयास मिळतो. स्वतःला विसरून दुस-याला मनापासून आपले सर्वस्व अर्पण करणारी गिरिजा तिची स्वतःचीही कांही मूल्ये ती जोपासताना दिसते. ( जमुना के तीर )

आपला कांही दोष नसताना नव-याच्या मनोभंगामुळे घर सोडणारी, स्वाभिमानाने जीवन जगू पाहणारी पण मुलगा दैवाने हिरावून नेल्यावर शून्य मनाने ग्रासलेली, रित्या घराने गिळायला घेतलेली, एक अनाथ, पराजित स्त्री म्हणजे निर्मला होय. पुन्हा मातृत्वाची भावना मनात निर्माण झाल्यावर पुन्हा एकदा तुमच्या मुलाची आई होण्याची संधी द्या. अशी आपल्या निष्ठूर कठोर व ज्याने तिच्या व्यक्तित्वाला डंख मारला. त्या पतीपुढे पदर पसरून याचना करणारी पण परपुरुषाचा विचार स्वप्नातही न करणारी अशी ही मानिनी आहे. ( मानिनी )

स्वतःकडे आकर्षण, मनोवेधक काहीही नसताना फार मोठया आकांक्षा मनात बाळगून एका वेगळ्याच व्यक्तित्वात गुरफटुन गेलेली एक निग्रही स्त्री

आहे. त्यामुळे घरात वडील आणि तिच्या विचारात संघर्ष होऊन ती घर सोडते. विश्वास कुलकर्णी हा तिचा प्रियकर तिला खोटया सबबी सांगून प्रेमात तिला फसवतो. ऑफिसमध्ये तिची नाचक्की होते. सर्वत्र अशा प्रकारे फरफट झालेली ही नमू शेवटी अपयशी ठरते. हुषार बुध्दीमान असूनही तिच्या पदरी कांहीच पडत नाही. ( अंधेरी )

जातीच्या भिंती भेदून, घरच्यांच्या विरोधात स्वत: ख्रिश्चन असुनही ज्युलिया केदारखन्ना या पंजाबी हिंदूबरोबर प्रेमविवाह करते. ती अनुभवाने शहाणी झाली आहे. सोनवणे या महार जातीतील तरुणाला व त्याच्या बहिणीला वेळोवेळी मदतीचा हात ती पुढे करते. घाटगेचं लग्न जमवून आणण्याचा आटोकाट प्रयत्न करते. घाटगेला आपली बहिण न देता महार तो महार, चांभार तो चांभार, ढेड तो ढेड असा विचार सोनवणे मांडतो, त्यावेळी आपली मुलगी जर एवढी मोठी असती तर घाटगेला निश्चितपणे दिली असती. अशा महान व उदात्त विचाराची ज्युलिया फुले, शाहू आंबेडकराच्या विचारसरणीचा वसा पुढे चालवू पाहते. सोशल वेलफेअर बोर्डाच्या पुनर्वसनाच्या खात्यात नोकरी करते. या ना त्या कारणाने आयुष्यातून उठलेली सगळया धर्मांची, सगळया वयांची अनेक माणसं रोजच्या - रोज तीला भेटतात, त्यांची अनंत दु:ख त्यांच्या अनंत यातना पाहून हळहळणारी ज्युलिया आहे. ( भिंती )

स्वतंत्र विचाराची, जिद्दी पण नियतीच्या फे-यात अडकून कांही काळ खचलेली पण लहानपणापासून पाण्यावरच्या तेलाच्या थेंबासारखे वेगळी राहिली आहे. ललिता चाफयाचं फुल नाही. तर जास्वंदीची शिपटी आहे. जुनी मूल्ये झुगारुन स्वत:चे विचार ठामपणे मांडणारी आहे. एखाद्या सैनिकाशी लग्न करून त्याच्या शूर मुलांना जन्म देण्याची तिची कल्पना आहे. पती म्हणून एक पराक्रमी मर्द शूर सैनिक पुरुष तिला हवा आहे. म्हणून जगावेगळी जाहिरात देऊन अरूण घाटगे या विमानदलातील अधिका-याशी लग्न करते. युद्धामध्ये विमान अपघातात स्वत:चा पती गेल्यानंतरही खचून न जाता सर्वांचे सांत्वन करते. अरूणचा अंश आपल्या उदरात घेऊन नव्या आशेवर जगते. पण दिवस कमी

भरल्याने तिच्या पोटचा गोळा मृत - जन्मतो व पुन्हा ती नियतीच्या फे-यात सापडते पण मुळातच सैनिकाविषयी आदर असलेली ललिता पुन्हा दुस-या सैनिकाशी लग्न करण्याची जाहिरात देते. तिला चार-चौघीसारखा शिवणीच्या घरट्यातील संसार करायचा नाही. ( वेगळी )

काशीताई व अनुताई या थोर समाजसेवक विष्णुपंताने भोगलेल्या अभागी स्त्रिया आहेत. एकीला मुल होत नाही म्हणुन , तर दुसरीला हुंड्यासाठी लाथाडले गेले. स्त्री वैभवाच लेण एकदा स्त्रीने परिधान केले की, पती सोबत असो व नसो ते सौभाग्याच लेण काशी व अनु या दोन स्त्रिया शेवटपर्यंत जपतात. हिंदू स्त्रीच्या पावित्र्याचे दर्शन या दोन व्यक्तिरेखेतून जाणवते. या दोघी समदु:खी असून एकमेकीला आधार देतात. (टेकड्या, डोंगरास्पदया)

दीपाकडं रसरसलेलं यौवन आहे. स्वत:च्या पायावर उभे राहून तिने शिक्षण घेतलेले आहे. घरकामाची व टापटिपीची आत्यंतिक आवड आहे. गोड गाता गळा आहे. आणि तिच्या हातात कलाकुसर आहे. पण तिला मान, स्वाभिमान गुंडाळून ठेवून चहाचा ट्रे घेऊन नवरदेवासमोर लाचारीनं उभं राहिल्याची खंत दिपाला वाटते आईच्या घटस्फोटाचा प्रश्न तिच्या लग्नाच्या आड येत असतो. त्यामुळे तिचे लग्न जमत नाही. अनेक वेळा आईच्या आग्रहास्तव अनेक वरांच्यासमोर तिला लाचारीनं उभा राहावं लागतं शेवटी अनुप गोडबोले तिला पसंत करतो. पण आईवडिलांना तो घाबरतो. त्यावेळी हातात बांगड्या भरण्याचा सल्ला दिपा त्याला देते. अनुपच्या म्हणण्यानुसार त्याच्या म्हाता-या आईवडिलांना फसवुन लग्न करण्यांत तिला स्वारस्य वाटत नाही. कारण ती आजपर्यंत ताठ मानेनं स्वाभिमानानं आणि निष्कलंक जीवन जगली आहे. तिच्या अंगात धमक आहे. त्यामुळे वाटेल ते ' शार्टकट' ती शोधत नाही. ( शार्टकट )

तरल वृत्तीने सर्वस्वी विरोधी असुनही सारे घर सांभाळणारी काकु आहे, आणि वेचक सुंदर दिसेल ते पडेल त्या किंमतीत आणणारे, वाचनाचे

व खाण्याचे भाऊ भोक्ते असून त्यांचे प्रसंगाप्रसंगातून लोभस दर्शन घडते. मनुकाकी बेफिकर स्वभावाची असून घरातील कामधंदा सांभाळता - सांभाळता मुलांना विनोद सांगून हसविणारी विनोद म्हणून मुलांच्या करमणुकीसाठी मोठ्या दिराची झोपेत असताना शेंडी कापणारी, स्वप्नांक न येणारी प्रसंगी हट्टी बनणारी व स्वतःचे स्वतंत्र बि-हाड थाटू पाहणारी, पण तितकीच मायाळू वृत्तीची ती आहे. ( बि-हाड )

' एका शनिवारची गोष्ट' या कथेतील आई सतत म्हणीचा वापर करून बोलणारी, थोडी रागिट, नव-याने थट्टा केल्यावर रुसून फुगुन बसणारी आहे. तितकीच ती मायाळू व ममताळू आहे. अंजू पोरकी झाल्यावर पोरक्या पोरीला आईची माया देणारी व ती मोठी होईपर्यंत तिचा सांभाळ करणारी व आपल्या मुलांवर असा पोरकेपणाचा प्रसंग ओढवू नये, म्हणून परमेश्वराला प्रार्थना करणारी आई आहे. ( एका शनिवारची गोष्ट )

माझे भोग मलाच भोगले पाहिजेत असे म्हणणारी दुर्दैवी आनंदी आहे. आनंदीचे विश्वासवर प्रेम असते. त्याच्याशी विवाह करण्याची तिची इच्छा असते. पण जातीपातीच्या कारणामुळे तिचे वडील विश्वासला नकार देऊन आनंदीचा घात करतात. आनंदीला इच्छित तरुणाबरोबर लग्न तर करता येत नाहीच, पण ती एका राक्षसवृत्तीच्या फौजदारची पत्नी होते, आणि त्याच्या वासनेचा बळी ठरते. रोज रात्री निर्दावल्यासारखी होऊन यंत्रासारखं ती आपलं शरीर कळसूत्री बाहुलीप्रमाणं त्या राक्षसाच्या स्वाधीन करते. बाप, पती, मुलगा या पुरुष संस्कृतीच्या वर्चस्वाखाली ती दुबळी ठरते. नव-याचा त्रास, मुलाचा त्रास सहन करूनही घटस्फोटाचा विचार ती कधीच करीत नाही. अशी ही एक शोषिक स्त्री आहे. ( आनंदवन )

रघुची आई नियतीशी झुंज देते, या झुंजीत व्यक्त झालेला, तिचा संताप लक्षवेधक आहे. सर्व घरादारासाठी ती खस्ता खाते. लहान दिराचे कुल्ले धुण्यांपासून ते कॉलेजच्या शिक्षणासाठी हातीतील गोठ विकण्यापर्यंत करते.

मुका पांगळा होऊन पडलेल्या नव-याला दिरांनी घराबाहेर फेकल्यावर मात्र ती विव्हळ होते, त्यातुनही मोठया जिद्दीने गोठयात संसार मांडून पुन्हा उभी राहते. घर उध्वस्त करणा-या दिरांविषयी संताप व्यक्त करते, पण घराच्या काचा फोडायला निघालेल्या आपल्या रघूला मात्र ती आवरते. कारण अहोरात्र कष्ट करून तिच्या नव-याने बांधलेल्या घरावर तिचे अतिव प्रेम आहे. आहे त्या गरीब परिस्थितीत प्रामाणिकपणे जगण्याची सहनशीलता तिच्यात आहे. गरिबीतही सत्व जपणारी ही एक भारतीय स्त्री आहे. ~~गरिबीतही सत्व जपणारी ही एक भारतीय स्त्री आहे.~~ आपल्या नव-याबद्दल, मुलांबाळाबद्दल तिच्या मनात आपुलकी आहे. घराला आग लागल्यावर ही आई शेवटी अगतिक, असहय होते. (अकाली मोहोर)

भाऊ व काकू स्वभावाने कडकच होते. पावण्या रावळ्यांची दोघांनाही आवड होती. त्यांच्यासाठी पैसा खर्च करण्याचे भाऊंना, तर कष्ट घेण्याची काकुला भलतीच हौस होती. भाऊ रसिक होते, त्यामानाने काकूची रसिकता थिटी पडे, भाऊ कट्टर शाकाहारी होते, आणि काकू पक्की मांसाहारी होती. भाऊंना वाचनाचा, चमचमीत खाद्यपदार्थ आवडीने खाण्याचा व जे जे वेचक सुंदर असेल, ते ते पडेल ती किंमत देवून विकत घेण्याचा नाद होता. काकू मात्र एक साधी, व्यवहारी, सरळसोट स्वभावाची आणि चार माणसांची आवड असणारी होती. बाहयत: काकू व भाऊ हे जोडपं संपूर्णपणे बिजोड होतं. काकू सुंदर, तर भाऊ कुरूप, काकू अबोल, तर भाऊ मुलुखाचे बडबडे, काकू कामाच्या बाबतीत वागणुकीत अत्यंत काटेकोर आणि शिस्तीची आणि टापटिपीची, स्वच्छतेची भोक्ती होती. तर भाऊंचा सर्वस्वी गभाळ्ग्रंथी कारभार. ( माझे आई-वडील )

प्रौढ, भारदस्त, गंभीर प्रकृतीचे दिसणारे, चांगली ठसठशीत, नऊवारी पातळ, चोळी वजा जुनस, पोलक आणि साधा अंबाडा अशी गंगाधरची बायको आहे. काहिशी अबोल आतल्या गाठीची, मुलबाळ नसलेली, पतीचे म्हणावे तितके

प्रेम न मिळालेली आई होण्याची इच्छा पूर्ण न झालेली, व शेवटी योगा-योगाने लवंदे ह्या प्रियकराची तिला मंडईत गाठ पडते. तिचा नवरा घरी न सांगतासवरता कुठेही भटकत असतो. त्यामुळे लवंदेच्या घरी जाताना तिला नव-याच्या परवानगीची गरज भासत नाही. भाचीसाठी बाळंतविडा तयार करते म्हणून सांगणारी व लवंदेच्या घरी पोच करणारी ही खोटारडी। थापेबाज। धोका देणारी आहे. ( खोटारडी )

' शार्टकट' मधील दिपाची आई घटस्फोटीत असून मुलीच्या लग्नाची तिला चिंता वाटते. पुरूष प्रधान संस्कृतीचा तिरस्कार करते. आपला नालायक माणसांशी विवाह होऊन आपल्या आयुष्याची परवड झाली, पण आपल्या सोन्यासारख्या मुलीचे नुकसान होऊ नये ही खंत तिला वाटते. ( शार्टकट )

<u>ब) पुरूष व्यक्तिरेखा :</u>

फोटोग्राफीच्या वेडाने पछाडलेला एक कलंदर पारशी म्हणजे जहाँगिर होय. त्याला लहान मुलांशी स्नेह आहे. त्याची व्यवहारी जगात कुचंबणा होते. त्याच्या सहज वागण्यामुळे तो एक दिवस धोक्यात येतो. निर्मळ चारित्र्याचा, स्वच्छंदी व स्पष्ट बोलणारा, हा जहाँगिर स्वत:चे घरदार सोडून येतो. पोपट आणि मैना या लहान मुलांशी मैत्री करतो. त्यांच्यात रममाण होतो. पण फोटोग्राफीचा धंदा करूनही तो घराचे भाडे देण्याइतपत पैसा कमवू शकत नाही. दप्तरदाराकडे आलेल्या गरोदर महिलेला निष्पापपणे वाचवायला गेलेल्या जहाँगिरला मार खावा लागतो, असहाय, हतबल झालेल्या जहाँगिरला शेवटी वाडी सोडावी लागते. ( गानेवाला पंछी )

श्रीनिवास हा अनाथ असून आईवडिलांविना पोरका आहे. तो अनाथआश्रमात वाढला आहे. त्यामुळे आपले आई-वडील, घर, अंगण असावे असे त्याला वाटते. आणि त्याचे कल्पनातीत चित्र तो शाळेत लहानपणी बाईंनी दिलेल्या निबंधातून रंगवितो. आपल्या अंगणात, पावसात नाचावे, बाबांनी

बुलबुल तरंग वाजवून गाताना पायात चाळ बांधुन मुलींसारखे रात्रभर त्याला नाचावंसं वाटतं, निबंधातील मुक्त कल्पनेतून श्रीनिवास अतृप्त इच्छांना वाट करून देतो. घरोघरी पेपर व दुधाच्या बाटल्या टाकताना मात्र वास्तव, विदारक व भयावह जगाची जाणिव त्याला होते, अनाथ पोरका श्रीनिवास या जगात वावरताना शेवटी पोळून निघतो. ( श्रीनिवास पानसेचे अंगण )

पुरुषोत्तम हा पौरुष हरवलेला पुरुष आहे. त्याचे नावच फक्त पुरुषोत्तम आहे. पण तो साधा पुरुषही नाही. एका रात्री एक भयानक जाणिव त्याच्या मनाला स्पर्श करून जाते. व त्याच्यात एक न्यून निर्माण होतो, आणि ठरलेलं लग्न तो त्या बिच्यारीच्या आयुष्याचं नुकसान होऊ नये म्हणून मोडतो तो चांगल्या डॉक्टरकडून शस्त्रक्रिया करून घेतो. अमाप पैसा खर्च करतो, पण उपयोग होत नाही. म्हणुन हा पुरुषोत्तम देह विक्रय करणा-या गिरिजाकडे येतो, व शेवटी तिच्या घट्ट बाहुपाशात स्वत:चे पौरुष परत मिळवितो. ( जमुना के तीर )

श्रीनाथ दूरदृष्टीचा संयमी व अंतर्मुख वृत्तीचा आहे. पेपरलाईन, सांभाळून शिक्षणाची आवड असणारा श्रीनाथ बी. ए. होतो. लहानपणी एका शिक्षकांनी दिलेले विचार संस्कार ऋण आणि आईला दिलेले वचन पाळण्यासाठी धडपडतो. त्याच्या पाय घसरलेल्या बहिणीचा विवाह तिच्या हितासाठी वडिलांच्या विरोधात जावून करतो. जाती-पातीचा येथे तो विचार करीत नाही. आपल्या कुटुंबाच्या हितासाठी अंजनी सारख्या सुंदर व त्याच्या सुखदुःखात समाविष्ट होणा-या सालस तरुणीच्या प्रेमाचा त्याग करतो. शेवटी गुण-अवगुन मोठया शिताफीने वापरून आपल्या जागेचा दुरुपयोग करून पैसा कमवतो, पण हे ऐशआरामी सुखही त्याला काटयासारखं सलतं आहे. ( लेबल )

अरुण घाटगे हा देशाभिमानी आहे. देशाविषयींच्या गोष्टींना त्याच्या मनांत प्रथम स्थान आहे. सरदार घराण्यातील असूनही डामडौल,

ऐषआराम यांना त्याच्याकडे थारा नाही. घरच्या माणसाशी त्याचे तत्वत: पटत नाही, पहिल्या भेटीतच ललिताला लग्नाविषयी स्पष्टपणे विचारतो व लग्न करून सहा दिवसातच युध्दावर जातो. त्याचे आयुष्य म्हणजे आळ्याव-रच्या पाण्यासारखं आहे अचूक बॉंब फेकीत अपघातात तो मरण पावतो. (वेगळी)

रानटी व राक्षसी वृत्तीचा फौजदार स्त्रीला फक्त भोगवादी वस्तू म्हणूनच पाहतो. तिच्यावर जनावराप्रमाणे तुटून पडतो. बायको त्याच्यालेखी चौकीवरचा गुन्हेगारच असतो. बायकोच्या गर्भार अवस्थेतही शेवटपर्यंत बेमुर्वत-पणानं तिला भोगत राहतो. उगीचच कुणावर तरी राग काढणं हा त्याचा फौजदारी खाक्या आहे. आपल्या फौजदारी खात्याचा दम दाखवून भिकारीण, कचरा गोळा करणारी भंगीण यांचा उपभोग घेतो, व आपल्या बायकोपेक्षा त्या ब-या असे निर्लज्जपणें सांगतो. बायको अशक्त होते, त्यावेळी हे पांढरफटफटीतं मढं हवंय कुणाला म्हणुन सोडचिठ्ठी देण्याचा निर्धार करतो. ( आनंदवन )

स्वत:ची पत्नी सुंदर, सुरेख असुनही पर स्त्री विषयीचे विचारचक्र प्रदिपच्या मनात फिरत आहे. सिगारेटचे झुरके मारत एकांतात कल्पनांतीत पातळीवर तो ' सुगंधा ' या स्त्रीचे चित्र पाहतो. तिला जवळ आणण्याचा प्रयत्न करतो. पण शेवटी कल्पित हे वास्तव होणार नाही. म्हणुन तुर्त तरी स्वत:च्याच पत्नीचा विचार करतांना आढळतो. ( पुरुष )

अनुप गोडबोले इंजिनिअर असून घरचाच श्रीमंत आहे. दिपाला पाहायला गेल्यावर तिच्या गाण्यात गुंतून पडतो. तिच्या गाण्यास तो दाद देतो. डोळ्यांनीच तिला पसंद दर्शवितो. दिपाला नाकारणं त्याच्या शक्तीबाहेर होऊन बसतं पण त्याचे आई - वडिल हृदयविकारानं आजारी असल्यामुळे त्यांचे मन तो मोडू शकत नाही. त्याच्या आईवडिलांना भावंडं, घरदार, आई-वडील असलेली मुलगी हवी आहे, पण हे दिपाकडे नाही. त्यामुळे त्याची फारच पंचाईत होते. कारण त्याला आई-वडील आणि दिपाही हवी आहे. त्यामुळे दिपाच्या वडिलांना घरी बोलवून लग्न करण्याचा मधला शार्टकट तो शोधतो. ( शॉर्टकट )

घाटगे हा एम. एस. सी. झालेला असून उमदा, रुबाबदार, वागण्या-बोलण्यात अत्यंत अदबशीर व पध्दतशीर, साहित्याची कलांची आवड असलेला तरुण आहे. कधी कधी स्वत: कविता करण्याची व चित्र रेखाटण्याची आवड आहे. चाळीशी जवळ आली तरी तो अविवाहीत आहे. त्याचे आडनांव घाटगे असले तरी तो जातीने चांभार आहे. त्यातही येड म्हणुन त्याचे लग्न जमत नाही. तो सरकारी नोकरीत असून बुध्दीमान ऑफिसर आहे. ( भिंती ) विश्वास हळव्या आणि भाबडया स्वभावाचा आहे. विश्वासाच्या हत्वादी प्रेयसीने धोका दिल्याने प्रेमभंग झालेला हा तरुण अस्वस्थ झाला आहे. त्याची आजी त्याला वाचविते. ( प्रीतीचे दान )

बी. एस. सी. झालेला सोनवणे हा स्मार्ट तरुण असून एक कार्यकर्ता आहे. सकाळी – दुपारी कॉलेज, रात्री नाईट कॉलेजमध्ये शिकवण्या करुन पुढील शिक्षण घेतो आहे. उच्च वर्णीय लोकांच्यावर भडकणारा असून त्याचे रक्त उसळणारे आहे. सवर्ण अस्पृश्य म्हणून त्याला अपमान सहन होत नाही. पण स्वत:च्या बहिणीला घाटगे या येडचांभार जातीतील तरुणाला द्यायची वेळ येते, त्यावेळी मात्र जातीभेद मानणारा आहे. घाटगेला जर आपली बहिण दिली तर आपल्या जातीतील लोक आमच्या तोंडात शेण घालतील असे ज्युलियाला सांगणारा, जाती पोटजातीचे जन्मजात संस्कार असलेला व आपल्या पुरतेच पाहणारा हा तरुण आहे. ( भिंती )

लंवदे हा संसारी माणूस असून त्याला तीन मुले आहेत. मणक्याच्या आजारात त्याची बायको दगावते. अडचणीमागून अडचणी येऊन त्याच्या संसाराची वाताहत होते. त्यामुळे तो स्वत:च सिक लिव्हर होतो. आणि संसाराला व जीवनाला कंटाळतो. सुरुवातील उंचापुरा, देखणा, राजबिंडा, दिसणारा लवंदे पाण्याचा पितर होऊन कळकट होतो. शेवटी योगायोगाने जिच्याशी त्याला लग्न करायचे असते ती गंगाधरची बायको एक दिवस त्याला मंडईत भेटते. पत्नी गेल्यावर ती त्याच्या घरी येऊ लागते. व घरचं सर्व पाहू

लागते. त्यामुळे त्याला थोडी उमेद येते. त्याच्या काळ्या आयुष्यात थोडा प्रकाश निर्माण होतो. ( खोटारडी )

३) भाषाशैली :

भाषाशैलीवर कथेतील ब-याच गोष्टी अवलंबून असतात असे म्हटले तर वावगे होणार नाही. कथेतील भाषाशैली त्यातील प्रसंग, नायक-नायिका यांना शोभेल अशी असावी. भाषा फारशी अलंकृतही नसावी. परिणामकारक जर भाषा असेल तर वाचकांची मने गुंतून राहतात. त्यामुळे भाषा जिवंत, साधी, सोपी व जिव्हाळ्याची असावी. कथेतील भाषा विषयाला सुसंगत असावी. एक मित्र दुस-या मित्राशी सहज गप्पा मारतो तसे लघुकथेचे स्वरुप असावे भाषा हे साहित्याचे माध्यम असून भाषेतूनच रचना करावयाची असते. याचे भान कथाकारांना असावे लागते. हे भान वसुधा पाटील यांनी आपल्या कथेतून ठेवल्याचे जाणवते.

भारतीय संस्कृती पुरुषप्रधान असल्यामुळे पुरुषाने स्त्रीला व्यक्त होण्यासाठी जेवढी मोकळीक दिली तशी व तेवढीच स्त्री व्यक्त होत आली.

पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावाचा व भाषेचा हात सोडून स्त्रीला स्त्री म्हणून कधी व्यक्तच होता आले नाही. तसे पाहिले तर विषय व भाषा दोन्ही बाबत स्त्रीची स्वतःचीही कांही खास क्षेत्रे आहेत. स्त्रिया व पुरुष भाषेचा वेगळा वापर करतात. असे भाषाशास्त्रातही सांगितले आहे. याचा प्रत्यय त्यांच्या भाषाशैलीतून जाणवतो.

वसुधा पाटील यांची भाषा साधी, सरळ व ओघवती आहे. अलंकाराने ती बोजड झालेली नाही. घरगुती पात्रांच्या स्वभावाशी सुसंगत अशा संभाषणाने तिची माधुरी वाढलेली आहे. त्यामुळे ती साधी सुधी बाळबोध वळणाची वाटते. तिच्यात नटवेपणा नाही. आपल्या भोवतालच्या ब-यावाईट माणसांचे ती वर्णन करते. त्यांच्या सुख-दुःखाशी ती समरस होते. त्याप्रमाणे स्पष्ट भाषेच्या मांडणीतून अनिष्ठ रुढीवर ती टिकाही करते. कांही वेळा त्यांची भाषा म्हणीतून अवतरते.

म्हणी म्हणजे अनुभवाच्या खाणी. म्हणीच्या माध्यमांतून बोलणे ही एक स्त्रीची वेगळी लकब आहे. स्त्री नेहमी म्हणींचा वापर करून घरी बोलत असते. वसुधा पाटील यानी स्त्रीसुलभ मनाचे दर्शन म्हणीच्या माध्यमांतून घडविले आहे. त्यांनी वापरलेल्या म्हणीतील भाषेत गोडवा, रसाळता आणि वाचकाच्या मनाला आकर्षित करून घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषाशैलीत आहे. उदा." 'गुरुसे शिष्य सवाई', ' रोज मरे त्याला कोण रडे', ' खाण तशी माती', 'नळी फुंकीली सोनारे,- नि इकडून तिकडे गेले वारे', 'नाव सोनुबाई नि हाती कथलाचे वाळे', 'इकडे आड तिकडे विहीर', 'गाढवाला गुळाची चव काय', 'अग्र अग्र म्हशी मला कुठे नेशी', जेनुं काम तेनूं ठाय बिजा करे सो गोता खाय', 'रिकामी न्हावी नि भिंतीला तुंबडया लावी', 'अति तिथे माती', 'गोगलगाय नि पोटात पाय', 'उथळ पाण्याला खळखळाट फार', 'न कर्त्याचा वार शनिवार', 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती'."[४] ( ज.के. तीर, एका शनिवारची गोष्ट- पृ. १०,११). म्हणीतून वसुधा पाटील यानी आपल्या भाषाशैलीचे वेगळेपण दाखवून दिले आहे.

"मी तिची लायब्ररी पाहिली आणि चाटच झाले. तिची खोलीच एकंदरीत अतिशय नीटनेटकी, आकर्षक आणि स्वच्छ होती. मोजकं सामान सुबक रीतीनं लावलेलं. विद्यार्थ्याला आवश्यक त्या सर्व सोयी वडिलांनी तिला करून दिल्या होत्या पण खोली कलात्मक रीतीनं प्रसन्न, उत्तेजित वाटेल अशा रीतीनं सजवणं हे तिचं कौशल्य होतं."[५] (वेगळी-वेगळी पृ. १२७) यावरून त्यांची भाषा साधी, सोपी, निटनेटकी व आकर्षक आहे. त्याचबरोबर छोटी छोटी वाक्यरचना असून आशय गर्भ आहे.

वाचकाच्या अंतर्मनाला भिडणारी त्यांची भाषा शैली 'मनू' या कथेतील मनू ज्यावेळी घरी येते त्यावेळी तिच्याबद्दल आपुलकीने व उतावीळपणे चौकशी करताना वडील म्हणतात, " अगं लबाडे, म्हणजे बि-हाड थाटूनच इथं आली आहेस होय ? अग अग खुळे, सांगायचं नाहीस आल्यासरशी ? काय करतात तुझे यजमान ?

कुठं मांडलं आहेस बि-हाड ?
अग पण त्यांना का घेऊन आली नाहीस इंथ ?
आम्हांला पाहयला नको आमचे जावई ?
आमच्या शहाण्या मुलीनं आपला जोडीदार कसा शोधून काढलाय पाहयला नको का आम्हांला ? त्यांचे प्रश्नांवर प्रश्न चालू होते आणि मनू आत उभी होती. प्रश्न थांबले आणि ती ओठ आवळल्यासारखे करून म्हणाली, "ते आता हयात नाहीत बाबाद... तिचे वडील गांगरले. पुरूषासारखे पुरुष पण हतबल होऊन खाली कोसळायच्या बेतात आले आणि मनू ताठ उभी होती. "अग पोरी, अग काय हे तुझ्या नशिबात ? लग्न तरी झालं होतं काय तुमचं ?" शेवटची आशा म्हणून शुध्दीतून बेशुध्दीत शिरता शिरता तिच्या वडिलांनी केविलवाणं तोंड करून विचारलं, त्यांचे कान आतूरले होते मनूचा 'होय' हा शब्द ऐकायला.

पण मनू खोल आवाजात म्हणाली "नाही", आणि तो शब्द ऐकताच ते पुरते बेशुध्द होऊन पडले. मनूनंच कसबस त्यांना सावरलं म्हणून नाहीतर उभेच्या उभेच कोसळले असते ते."[६] (मनू जे.के. तीर पृ. ५४) यातून वसुधा पाटील यांच्या भाषेतील नाट्यमयता आणि आवेगीपणा जाणवतो. वाचकाला भावूक व विषण्ण करण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषाशैलीत आहे.

"अंग शिथिल सोडून खडकावर ती नुसती पहुडली होती. साडी वा-याच्या झुळकीसरशी फुगत होती. वर होत होती. गो-यापान रेखीव पोट-या, नाजूक गुलाबी पावलं उघडी पडत होती. तिला त्याची क्षिती नव्हती, पदर उडत होता. ढळत होता. तो अंगाभोवती लपेटून घेण्याचा प्रयत्नही ती करीत नव्हती. नुसतीच सैर-भैर नजर उसळून खडकापाशी फुटणा-या फेसाळणा-या लाटावर फिरवीत ती स्तब्ध बसली होती. स्वत:शीच हसत होती. भुरभुरणारे केस सावरीत होती. मध्येच मागील खडकावर रेलत होती आणि एक सारखी गुणगुणत होती गुणगुणताना शिंपल्याशी खेळत होती."[७] (ज.के. तीर-ज.के. तीर पृ. २१७) वाचकाच्या मनाला उत्कंठा लावणारी

सुबक व आकर्षक अशी त्यांची भाषाशैली आहे. त्यांची भाषा दिलदार खानदानी अंतःकरणाची असून कुलवान व अत्यंत संस्कारीत आहे. स्त्री सुलभ मनोविश्लेषणात्मक स्त्रीच्या व्यक्तित्वात असणारे विविध पैलू एकीकडे नियतीशी असणारे तिचेनाते आणि दुसरीकडे जीवनाव्यवस्थेशी असणारा संबंध आणि त्यातून माणसांची व्यक्त होणारी शोकांतिका हे सारे समर्थपणे व्यक्त करण्याचे सामर्थ्य वसुधा पाटील यांच्या निवेदन शैलीत आहे.

४) कथांचे वेगळेपण :

'जमुना के तीर' आणि 'वेगळी' यातील कथांचा साकल्याने अभ्यास केल्यानंतर वसुधा पाटील यानी आपल्या कथेतून ज्या नव्या जाणिवेने व नव्या जोमाने लेखन केले. त्याचा शोध घेत असतांना आपल्याला त्यांची स्त्रीवादी असणारी पुरेपूर जाण त्यांच्या कथांतून प्रगट होते. त्याचा थोडक्यात परामर्श घेता येईल.

स्त्री आणि पुरुष असे समाजाचे दोन स्वतंत्र घटक आहेत. पितृसत्ताक पध्दतीत प्रत्येक स्त्रीवर समाज नियमांचे दंडक बसविले जातात व ते जन्मजात असल्याचा अभास निर्माण केला जातो. पण जी स्त्री असे लेबल झुकारून देते ती विकृत व पुरुषी मानली जाते. वसुधा पाटील यांनाही पुरुषी पध्दतीचे लेखन करणाऱ्या लेखिका म्हणून वाचकवर्गाने हिणवीले. असे त्यांच्या मुंबई येथे घेतलेल्या मुलाखतीतून आढळून आले. स्त्रीला बायकी म्हणून हिनवले गेले, पण सर्वच स्त्रिया बायकी नसतात.

वसुधा पाटील यांचे लेखन केवळ स्त्रीवादीच आहे असे नव्हे तर 'गानेवाला पंछी' मधील फोटोग्राफीच्या वेडाने पछाडलेल्या कलंदर पारश्याची समाजातील उपेक्षा 'पुरुष' कथेतील अस्वस्थ प्रदिप, 'श्रीनिवास पानसेचे अंगण', मधील अनाथ व पोरका श्रीनिवास आनंदभवन' मधील फौजदार यांचे वर्णन ही वाचनीय ठरते.

वसुधा पाटील यांच्या कथातील काही मर्यादा पाहत असतांना 'अकाली मोहोर' सारख्या त्यांच्या काही कथा अवास्तव पसरल्यामुळे त्या पाल्हाळीक वाटतात. असे असले तरी त्या वाचनीय ठरतात. 'स्त्री' कथा जशी त्यांनी प्रभावीपणे मांडली तशी 'पुरुष' ही, कथा तितकीच प्रभावी मांडता आली नाही. याचा प्रत्यय त्यांची 'पुरुष' कथा वाचताना येतो. 'मनू' चे कुमारी मातृत्व तिच्या व्यक्तित्वाशी विसंगत होते. किंवा सुचेताच्या नियोजित वराचे बदफैलीपण आवश्यक होते की तशी आवश्यकता भासली असा प्रश्न मनात येतो. यामुळे कथा फारसी बिघडते असे नाही. पण कथारचनेत या गोष्टी खटकतात. एवढे मात्र खरे.

पुरुष प्रधान संस्कृतीला बळी गेलेल्या, शोषीत, पिडीत दबलेल्या अस्तित्वशून्य अशा 'स्त्रियांचे चित्रण' टेकड्या, डोंगराएवढ्या' आणि 'आनंदवन' सारख्या कथेतून वसुधाबाईंनी केले आहे. टेकड्या,' डोंगराएवढ्या' मधील काशी, अनु, सरस्वती या तीन स्त्रिया एका थोर समाजसेवकाने भोगलेल्या अभागी स्त्रिया आहेत. विष्णुपंत या समाज सेवक म्हणून मिरविणा-या नराधमाने आपल्या पुरषी वर्चस्वाखाली त्यांना दाबून टाकले आहे. 'आनंदवन' मधील आनंदीही अशीच नवरा व बाप यांच्या वर्चस्वाखाली खंगून गेली आहे.

पाश्चिमात्य साहित्याचाही प्रभाव आजच्या स्त्रीवादी साहित्यावर असल्याचे जाणवते त्या अनुषंगाने वसुधा पाटील यांचा विचार करता "विजया राजाध्यक्ष, वसुधा पाटील, चारुता सागर, आनंद यादव हे कथाकार प्रियेट बेट्स, मोराव्हिया, हेमिंग्वे, अपडाईक, कॅथाईन, मॅनसफिल्ड, मॉम कॅथरिन पोर्टर, यांच्या तोडीस उभे राहतील असा विश्वास वाटतो."[१] असे म. द. हातकणंगलेकर म्हणतात. आणि वसुधा पाटील यांच्या बाबतीत उचितच मानावे लागेल कारण मनू जोडीदाराबरोबर सहा महिने राहून त्याची पारख करणे हा विचार तशा पध्दतीचा आहे.

केवळ स्त्री मुक्तीचाच किंवा स्त्रीच्या समस्या स्त्रीची मते यांचाच नव्हे तर जगाचे एक वेगळे दर्शन 'गानेवाला पंछी' मधील पारसी तरुणाच्या व्यक्तिरेखेतून किंवा 'जमुना के तीर' मधील गिरिजा व पुरुषो-त्तम यांच्या व्यक्तिरेखेतून साकार केला आहे. "पुरुषप्रधान संस्कृतीनेच गोडवा, विनय, नाजूकपणा, मातेचे महात्म्य वगैरे स्त्रीपणाच्या दंतकथा निर्माण केल्या आहेत व हे गुण स्वाभाविक आहेत. अशी ऐतिहासिक परंपरा निर्माण केल्या आहेत व हे गुण स्त्रियांवर लादण्याचे पितृस-त्तेचे राजकारण आहे."[8] असे डॉ. अश्विनी धोंगडे म्हणतात. पण स्त्रीवादी त्याला आव्हान देवून हा गोंधळ मोडून काढू इच्छितात. वसुधा पाटील याना स्त्रीवादाची पूर्ण जाणीव आहे. त्यानी हे सर्व झुगारुन लेखन केलेले आहे. याची जाणीव त्यांच्या कथांतून येते.

सामाजिक चळवळीच्या अनुषंगाने स्त्रीवादी साहित्याचा विचार करत असताना त्या चळवळीच्या अनुषंगाने जे प्रश्न स्त्रियांच्या बाबतीत उपस्थित झाले. त्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम स्त्रीवादी साहित्यातून होऊ लागले. त्या दृष्टिने वसुधा पाटील यांच्या काही कथा महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत. त्यामध्ये 'टेकडया। डोंगराएवढया' या कथेतून विष्णुपंत हा समाजसेवकच कसा अन्यायी व भोगवादी आहे. याचे दर्शन घडते. तो आपल्या पहिल्या पत्नीला मूल होत नाही म्हणून बारा वर्षे भोगून सोडतो, तर दुसरीलाही हुंडयासाठी सोडून देतो. समाजसेवेचा बुरखा पांघरलेला हा समाजसेवक नसून एक ढोंगी आहे. अनेक स्त्रियांचे प्रश्न, त्यांच्या समस्या, हुंडापध्दती, विधवा, परित्यक्ता, वेश्या व नपुसकत्वाच्या समस्या आपल्या कथातून मांडतात. स्त्रीवादाने स्त्रीला एक वेगळी नजर दिली. त्यामुळे स्त्रीच्या साहित्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. वसुधा पाटील यांनी या दृष्टिकोणातून 'मनू' सारखी कथा साकार केली. मनूला स्वत:च्या पायावर धीरगंभीर उभे केले. त्यामुळे स्वत: एकटेपणाने सर्व सहन करण्याचे सामर्थ्य तिच्यात आले. वसुधा पाटील यांच्या कथेतील स्त्रियांना आत्मविश्वास आहे.'निवडीचे स्वातंत्र्य' व 'स्वत्वाचा साक्षात्कार' आजपर्यंत

स्त्रियांनी अभावाने सुद्धा अनुभवला नव्हता तोच साक्षात्कार त्यांनी आपल्या कथेतून व्यक्त केला.

स्त्रियांचे म्हणून काही खास, प्रश्न, समस्या असतात. पुरुषांच्या साहित्यातून त्या आल्या असल्या तरी तितक्या प्रभावी व सुक्ष्मपणे आल्या नाहीत. त्याच स्त्रियांच्या मनाचे विविध पदर वसुधा पाटील यांनी आपल्या कथांतून प्रभावीपणे मांडले आहेत. 'स्त्री' सारख्या कथेतून स्त्रीच स्त्रीच्या समस्या भावना समजू शकते हे इंदिरेच्या व्यक्तिरेखेतून जाणवते. इंदिरा एक स्त्री असल्याने सतरा वर्षे विधवा असलेल्या आपल्या आक्काच्या विरह वेदना जाणून घेऊन आपल्या नव-याला तिच्याकडे पाठविते. एक स्त्री लेखिका या नात्याने स्त्रीच्या अत्यंत तरल व हृदयस्पर्शी भावना वसुधा पाटील रेखाटतात.

नात्यागोत्याचा कांही वेळा त्यांच्या, कथातून तिरस्कार केला आहे. 'अपेशी', 'अकाली मोहोर', 'प्रीतीचे दान', इत्यादी कथातून त्याचा प्रत्यय येतो. तर 'एका शनिवारची गोष्ट' ही लेखिकेच्या चिंतनातून व्यक्त होताना जाणवते. तर 'न्यूड' या कथेत आर्ट मास्टरच्या वेळ्चा अनुभव लेखिकेने कलात्मकरित्या व्यक्त केला आहे.

## संदर्भ



| अ.नं. | लेखकाचे नांव | ग्रंथ व नियतकालिके | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | फडके ना.सी. | प्रतिभासाधन-१९३१ | १०९ |
| २) | वडेर प्रल्हाद | आशय आणि अविष्कार<br>प्र.आ.-मार्च १९८८ | |
| ३) | गाडगीळ गंगाधर | खडक आणि पाणी<br>दुसरी आवृत्ती, १९६६ | २२५ |
| ४) | पाटील वसुधा | जमुना के तीर | १०, ११ |
| ५) | पाटील वसुधा | वेगळी | १२७ |
| ६) | पाटील वसुधा | जमुना के तीर | ५४ |
| ७) | तत्रैव | तत्रैव | २१७ |
| ८) | डॉ. जोगळेकर ग.ना.<br>डॉ. देव वीणा (संपा) | महाराष्ट्र साहित्य पत्रिका<br>ऑगष्ट १९९१<br>(स्त्रीवादी साहित्य<br>समीक्षा - डॉ.आश्विनी धोंगडे) | ५६ |
| ९) | हातकणंगलेकर म.द. | मराठी कथा : रूप आणि परिसर<br>प्र.आ. मार्च १९८६ | २८ |



....